# दगडी पाटी ते इलेक्ट्रॉनिक पाटी

- गीतांजलि अविनाश जोशी

**अत्याधुनिक तंत्रज्ञान व तत्त्वज्ञान यांच्या समन्वयाने सुरू झालेल्या 'मायविश्व' ने अल्पावधीतच लोकप्रियता मिळवली आहे. खेडेगावातील शाळेत, दगडी पाटीवर श्रीगणेशा गिरवताना मंदार जोगळेकर यांनी कदाचित एखादं वैश्विक स्वप्नच पाहिलं असावं... जगभर पसरलेल्या मराठी वाचकांना उत्तमोत्तम वाचनीय पुस्तकं पुरवणारी इलेक्ट्रॉनिक पाटी कशी करावी याचं... मंदार जोगळेकर या धीरगंभीर व्यक्तिमत्त्वाचा, 'साखरपा ते अमेरिका' प्रवास प्रत्येकाने अभ्यासावा असा आहे.**


साखरपा नावाच्या कोकणातल्या खेड्यातल्या मराठी माध्यमाच्या शाळेतून दहावीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर मंदार जोगळेकर पुण्याला आला, ते उच्च शिक्षणाचे स्वप्न उराशी बाळगून,स.प. महाविद्यालय व फर्ग्युसन महाविद्यालयात गेल्यावर प्रवेशासाठी लागलेल्या रांगा ,मुलामुलींची शहरी मोकळेपणाची वागणूक आणि आसमंतात फटाक्यासारखे बोलले जाणारे इंग्रजी ऐकून त्याला परत कोकणात पळून जावेसे वाटले.परंतु त्यानं धीर सोडला नाही आणि आपटे प्रशाळेत प्रवेश घेतला. विद्यार्थी साहाय्यक समितीच्या वसतीगृहात त्याच्या राहण्याची उत्तम सोय झाली. खेड्यापाड्यातून आलेल्या हुशार मुलांच्या राहण्याची व्यवस्था ह्या वसतीगृहात केली जातेच परंतू त्यांच्या व्यक्ति-मत्वाच्या विकासासाठी काम केले जाते. आपटे प्रशाळेतल्या शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे मंदारचे इंग्रजी सुधारले. वसतीगृहात कुठल्याही कामासाठी कर्मचारी नव्हते. तेथे राहणारी मुलेच सर्व कामे वाटून घेऊन पार पाडीत. मंदारने वाचनालयाचे काम मागून घेतले. पुस्तके खरेदी करायची, त्यांचे इंडेक्सिंग करायचे आणि ती पुस्तके इश्यू करायची अशा स्वरुपाचे हे काम होते, हे काम करतानाच मंदारला वाचनाची आवड लागली.

फर्ग्युसनमधून उत्तीर्ण झाल्यावर संगणकाचे प्रशिक्षण घेऊन मंदारने स्वतःचा व्यवसाय सुरू केला. विशिष्ट प्रकारचे सॉफ्टवेअर बनवून इतर कंपन्यांना देण्याचा हा व्यवसाय होता. तरूण वयात अनुभव नसताना सुरू केलेला व्यवसाय! एका सरकारी कंत्राटात जोरदार फटका मिळाला आणि हा व्यवसाय बंद करण्याची वेळ आली. स्वतःबरोबरच कंपनीत काम करणाऱ्या १५-२० सहकाऱ्यांचे भविष्यही डळमळीत वाटू लागले. हे सर्व घडण्याआधी एका अमेरिकन कंपनीने मंदारला नोकरी देऊ केली होती आणि मंदारने ती नाकारली होती. पुण्यात आपला जम बसवू पाहणाऱ्या ह्या अमेरिकन कंपनीला तंत्रज्ञान व व्यावसायिक ज्ञान दोन्हीही असणारी जबाबदार व्यक्ती हवी होती. मित्रांच्या सल्ल्यानुसार ही नोकरी स्वीकारायचे मंदारने ठरवले आणि इतर सहकाऱ्यांसहित तो नव्या नोकरीवर रुजू झाला. अमेरीकेत गेल्यावर आर्थिक दृष्ट्या सबलता आलीच परंतु पुष्कळ काही शिकायला मिळाले. जनरल मोटर्समधे काम करताना मंदारला जागतिक पातळीवर काम करण्याचा अनुभव घेता आला. पुण्यात असताना त्याने रानडे

इन्स्टिट्युटमधून जपानी भाषा आत्मसात केली होती. त्याचा उपयोग त्याला अमेरिकेत झाला. त्याने एक चांगली टीम बनवली आणि जागतिक पातळीवरचे प्रकल्प तो हाताळू लागला.

आर्थिक दृष्ट्या संपन्नता आणि व्यवसायतले यश पदरात पडूनही आयुष्यात जे हवे आहे किंवा आयुष्यात काय हवे आहे, ह्याबद्दल मात्र त्याच्या मनात संभ्रमाचे वादळवारे वाहात होते. एका भारत भेटीत तो पाँडिचरीला आणि कन्याकुमारीला गेला. लिथल्या आध्यामिक वातावरणात त्याने स्वत:च्याच मनाचा, इच्छा आकांक्षांचा, स्वप्नांचा शोध घेतला. आपल्याला मिळालेल्या ज्ञानाचा समाजहितासाठी उपयोग कसा करता येईल.तंत्रज्ञान आणि तत्त्वज्ञान ह्यांची योग्य ती सांगड कशी घालता येईल.अशा प्रश्नांचा त्याच्या मनाने ऊहापोह केला आणि ह्या सगळ्या विचारमंथनातून २००७ मध्ये माय विश्व ह्या संकल्पनेचे नवनीत निर्माण झाले मायविश्वच्या प्रतीक चिन्हातून (लोगो) ह्या संघटनेमागील तत्त्वाज्ञान संपूर्णतः समजते. एकातून एक निघणारी एकमेकांशी संलग्न अशी सात वर्तुळे. सगळ्यात आतील वर्तुळ व्यक्तीचे, त्यानंतरचे कुटुंबीयांचे, त्यानंतरची वर्तुळे नातेवाईक, स्नेही, व्यावसायिक संबंधी, सामाजिक संस्था ह्यांची व शेवटचे सर्वात मोठे वर्तुळ संपूर्ण विश्वाचे. बाहेरील सर्व वर्तुळांचे सामर्थ्य मिळाले तरच व्यक्तीचे वर्तुळ समर्थ होऊ शकेल आणि त्यासाठी बाहेरील सर्व वर्तुळे समर्थ असणे अत्यावश्यक आहे. माय विश्वच्या संकेतस्थळावर आपल्या दैनंदिन आयुष्याच्या प्रत्येक पैलूला अर्थपूर्ण आणि समर्थ करणाऱ्या योजना आपल्याला मदतीचा हात द्यायला सज्ज असतात. नवनवीन पुस्तकांची, नव्याजुन्या चित्रपटांबद्दलची माहिती, ताज्या बातम्या, विवाहयोग्य स्थळांची माहिती, नोकरीसंबंधी माहिती, इ-मेल, ब्लॉग...आणखी कितीतरी! 'वुई क्रिएट द टाइम' हे मायविश्वचे स्लोगन आहे. प्रत्येकाच्या अंतर्मनाला शांत, संतुलित शक्तिस्थान बनवण्यासाठी माय विश्व वचनबद्ध आहे.

मायविश्वचा मुख्य व्यवसाय सोशल नेटवर्कींगचे








सॉफ्टवेअर बनवण्याचा होता.सोशल नेटवर्किंग म्हणजे केवळ गप्पा मारण्हासाठी नसावे, समाजहितासाठी ह्या तंत्रज्ञानाचा सकारात्मक उपयोग व्हावा ह्यावर मंदारचा भर होता,आहे आणि भविष्यातही राहील.

बंद मुठीसारख्या कळीचे कमलपुष्प उमलत गेले की पाकळीमागून पाकळी उलगडत जावी इतक्या सहजपणे मायविश्वशी संलग्न परंतू तरीही स्वतंत्र संकल्पना मूर्तस्वरुपात येत गेल्या. ग्राहकांना नवे काय मिळेल ह्या उद्देशाने त्यातलीच एक कल्पना होती. ई - पेपर गॅलरीची. ह्या सेवेद्वारा चुटकी वाजवताच १५० वर्तमानपत्रे वाचकांना वाचायला मिळतात. जनरल मोटर्समधे असताना जुन्या कागदांचे जतन, संरक्षण, आर्काइव्ह कसे करायचे ह्याचा अनुभव मंदारने मिळवला होता. बुकगंगा डॉट कॉम सॅनहोझेच्या विश्व साहित्य संमेलनाला मंदार गेला असताना एका वरिष्ठ साहित्यिकाशी झालेल्या चर्चेतून ॲमेझॉन डॉट कॉमच्या धर्तीवर मराठी पुस्तके घरपोच देणाऱ्या बुकगंगा डॉट कॉम ह्या सेवेची कल्पना जन्मली, आणि त्यांना मंदारने वचन दिले की वर्षभरात ही कल्पना मूर्तरुप धारण करेल आणि खरोखरच अगदी ठरल्याप्रमाणे २००८ मध्ये बुकगंगेचा स्रोत वाहू लागला. बुकगंगा हा व्यवसाय नाही, एक सेवा आहे. मराठी वाचकाला दुकानात जाऊन पुस्तके चाळायला आवडते हे लक्षात घेऊन प्रत्येक पुस्तकाचे परीक्षण, त्यावरील भाष्ये, टिप्पणी हे सर्व वाचकाला वाचायला मिळते. त्याच विषयावरची इतर कुठली पुस्तके उपलब्ध आहेत हेही कळते. ह्यामुळे पुस्तकाची निवड करायला वाचकांना मदत होते. ऑन लाईन किंवा फोनवर मागणी नोंदवल्यावर त्वरित पुस्तक घरपोच पोचवले जाते. वाचकांसाठी २५० प्रकाशकांच्या हजारो पुस्तकांचे 'लिस्टिंग' केले गेले. ह्या सेवेला आर्थिक पाठबळ मिळवण्यासाठी आणि तरुण, विदेशी वाचकांच्या सोयीसाठी आणखी एक कमलदल उलगडले.इ-बुक्सद्वारे कॉम्प्युटरच्या बटणांच्या वापराने भारतीय भाषांमधली नवी-जुनी हजारो पुस्तके जगभरातल्या लाखो वाचकांना उपलब्ध करून देण्याची जादूची करामत बुकगंगेच्या ह्या नव्या प्रकल्पाद्वारे केली गेली. कॉम्प्युटरच्या अनेक उपयोगांच्या यादीत वाचन संस्कृतीची वृद्धी हा एक नवा उपयोग सामील करता येईल. वाचनाच्या रूढ पद्धतीबद्दल हट्ट करण्याऐवजी तरुण मनाला आकर्षित करेल अशा ह्या नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार केलाच पाहिजे.

बुकगंगा आणि माय विश्वचे कार्य झपाट्याने वाढते आहे. वैश्विक पातळीवर चालणाऱ्या ह्या कामाचा 'जगन्नाथाचा रथ' निर्वेध पुढे जात राहावा म्हणून कामाचा आराखडा बारकाईने आखला जातो आणि त्याप्रमाणेच काम केले जाते. माय विश्व कॉर्पोरेशनची तीन देशांत ऑफिसे आहेत. अमेरिकेतील फिलाडेल्फीया येथे कंपनीचे इन्फ्रास्ट्रक्चर व मार्केटिंग सेंटर आहे. तिथे केवळ आठ अतिशय कार्यक्षम व्यक्ती काम सांभाळतात. ऑस्ट्रेलियाच्या ऑफिसात साठ व्यक्ती आहेत. पुण्याच्या ऑफिसमध्ये ४० लोक कार्यरत आहेत. परंतु शिवाजीराजांच्या मावळ्यांप्रमाणे एकेकजण दहा लोकांसारखे काम करतो. कमी लोक जास्त काम कसं करू शकतील हा महत्त्वाचा विचार उद्योकांनी करायलाच हवा. तरच कामाचा व्याप सांभाळला जाईल. लोकांना काम त्यांच्या क्षमतेप्रमाणे द्यावे आणि ठरावीक कालावधीनंतर कामाचा 'रिव्ह्यू' घ्यावा तरच आराखड्याप्रमाणे काम होत राहाते.

वेगवेगळ्या प्रकल्पांचा हा एवढा प्रचंड डोलारा कसा सांभाळला जातो? मंदारच्या मते ह्याचे मुख्य कारण आहे व्यवस्थित नियोजन. पाच वर्षांच्या योजनांचा, त्यांना लागणाऱ्या आर्थिक बाजूचा संपूर्ण आराखडा तयार केला गेला व त्यानुसारच काम पार पाडले गेले. एक व्रत किंवा एक ध्यास म्हणून ह्या स्वप्नाचा मंदारने पाठलाग केला आणि तंत्रज्ञान व तत्त्वज्ञान ह्यांचा हा गोफ विणला.

मंदारचे वर्णन 'सिरिअल आंतरप्रेनर' असे केले जाते. 'बहुविध कल्पनांचा उद्योजक' असे त्याचे ढोबळ भाषांतर केले जाऊ शकेल. एखादी नवी कल्पना प्रत्यक्षात उतरवायची. तिचा जम बसवायचा आणि मग एखाद्या योग्य माणसाच्या हाती तो प्रकल्प सोपवून पुढे जायचे

असा ह्या उद्योजकांचा कार्यप्रवास असतो. एखादा माणूस एकच प्रकल्प चांगल्या रीतीने परंतु कारकीर्दीच्या अखेरीपर्यंत करतो. सिरियल आंतरप्रेनर मात्र नित्या नव्या वाटांच्या शोधात असतो.

मंदारच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक लोभस पैलू आहेत. ई.पेपरसाठी तो नियमित लेखन करतो. त्याला वाचनाची अत्यंत आवड आहे, पुण्यात असताना प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ सुमनताई करंदीकरांनी विद्यार्थ्यांची 'कसे वाचावे' ह्या विषयावर एक महिन्याची कार्यशाळा घेतली होती. त्यातून मंदार खूप काही शिकला. पुस्तकाची निवड कुठल्या निकषांवर करावी, पुस्तकातले सत्त्व कसे पारखावे आणि वाचलेले पुस्तक कसे स्मरणात ठेवावे हे सर्व सुमनताईंनी त्याला शिकवले. विद्यार्थीदशेत प्रसिध्द कवयित्री संजीवनी मराठे व शांता शेळके ह्यांची पुस्तके तो वाचत असे. स्पष्ट शब्दोच्चार, आवाजाचा वापर हे सर्व तो त्यातून शिकला. आपटे प्रशाळेत त्याला योगासने शिकवली जात. रामकृष्ण मठात त्याने शिवाजीराव भोसल्यांची प्रभावी भाषणे ऐकली होती. ह्या सर्व टिपून घेतलेल्या ज्ञानकणांतून तो घडला आणि त्याने इतरांना घडवले.

ह्या क्षेत्रात येणाऱ्या व्यक्तींसाठी मंदार सांगू इच्छितो, की जर तुमच्या पिंडाशी जुळणारे हे क्षेत्र असेल तर अवश्य ह्या क्षेत्राचा विचार तरुणांनी करावा. 'माय विश्व'मध्ये अशा तरुणांना, साहित्याच्या जाणकार व्यक्तींना समाविष्ट करता येईल. त्यासाठी त्यांना पुण्यातील पत्त्यावर अधिक माहिती मिळू शकेल.

आपल्यावरचे सामाजिक ऋण प्रत्येकाने कुठल्याही प्रकारे फेडायला हवे असे त्याला वाटते. त्याने स्वत:ही असा प्रयत्न सातत्याने केला आहे. प्लीमाऊथच्या बालविहार संस्थेत २०० मुलांना त्याने २ वर्षे योगासने व प्रार्थना शिकवल्या. वेळोवेळी त्सुनामी गुजरात, व महाराष्ट्रातील भूकंप पीडितांसाठी धनराशी जमवल्या. ज्ञानप्रबोधिनीच्या पध्दतीने लग्न, मुंजी, सत्यनारायण पूजांचे पौरोहित्य केले. कित्येक सेवाभावी संस्थांच्या वेबसाईट विनामूल्य करुन दिल्या.

माँटेगोमेरी येथील मंदिराच्या स्थापनेपासून मंदारचा मोठा हातभार लागला आहे. फिलाडेल्फियामधे १० दिवसांचा गणेशोत्सव लोकमान्य टिळकांच्या संकल्पनेनुसार साजरा केला जातो. ५० मुले अथर्वशीर्ष पठण करतात. २००४ ते २०१० ह्या गणेशोत्सवाची धुरा मंदारने सांभाळली.

गेल्या काही वर्षांमध्ये भरवल्या गेलेल्या विश्व साहित्य संमेलनांमधेही मंदारने हातभात लावला आहे. अशी संमेलने व्हायलाच हवीत. मात्र कुणाच्या कुबड्यांवर ती उभारली जाऊ नयेत. ह्या संमेलनातून तरुणांनाही वाव मिळावा, विविध चळवळींना प्लॅटफॉर्म देण्याचे काम ह्या साहित्य संमेलनांनी करावे असे मात्र त्याला प्रकर्षाने वाटते.

प्रसन्न व्यक्तिमत्त्व मंदार जोगळेकर हे एक असे अदभूत रसायन आहे. धीरगंभीर दर्शन आणि त्याला शोभेल अशी तत्वज्ञानी वृत्ती याच्याजवळ आहे. त्याच्या सर्व स्वप्नांची भागीदारीण गौतमीसारखी सुविद्य पत्नी आहे. मातापित्यांच्या, गुरुजनांच्या आशीर्वादाची छत्रछाया त्याच्यावर आहे.मग ही गगनभरारी अशीच नवे नवे उच्चांक गाठेल ह्यात काय शंका? मराठी वाचकाला दगडी पाटीपासून इलेक्ट्रॉनिक पाटीपर्यंत नेणाऱ्या, भारताचे नाव वैश्विक नकाशावर उज्वल करणाऱ्या ह्या वाचन संस्कृतीच्या प्रवर्तक मंदारला आमच्या खूपखूप शुभेच्छा!

❁ ❁ ❁

**- मंदार जोगळेकर**

इंडिया टेक्नोलॉजी सेंटर, १६, सावली

पनमाळा, सिंहगड रोडच्यासमोर, पुणे ३०

☎ : ०२०२४३२१०४२

❁ ❁ ❁

**- गीतांजली अविनाश जोशी**

प्लॅनेट मिलेनियम सोसायटी

ए-१५. फ्लॅट १०४,

पिंपळे सौदागर, पुणे २७

☎ : ९९७०७८८३०४